उद्योग उपसंचालक (प्रशासन) (गट-अ) या
संवर्गातील पदांवरील पदोन्नती

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक : इएसटी-२०१५/६०४/प्र.क्र.११५/उद्योग-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २२ जानेवारी, २०१६.

वाचा -

१) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्था-१/पदोन्नती/उअ-उससं(प्र)/७४२/ २०१५/अे-२१३९, दि.०७.०९.२०१५
२) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्था/पदोन्नती/७२२/उससं/२०१५/अे-२४८६, दि.०७.११.२०१५

शासन आदेश :-

उद्योग संचालनालयांतर्गत उद्योग अधिकारी (प्रशासन) (गट-ब) (वे.श्रे.रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४४००) या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यास पुढीलप्रमाणे उद्योग उपसंचालक (प्रशासन) गट-अ (वेतनश्रेणी रु.१५,६००-३९,१०० ग्रे.पे.रु.५४००) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव, ज्ये.क्र., प्रवर्ग व कार्यालय	पदस्थापनेचे ठिकाण	शेरा
१.	श्री.आर.एस.काकडे (खुला) (ज्ये.क्र.२) मुख्यालय, मुंबई	उद्योग उपसंचालक (प्रशासन), उद्योग संचालनालय, मुंबई	रिक्त पदावर

२. सदर पदोन्नती या आरक्षण अधिनियम २००१ प्रकरणी मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिका क्र.२७९७/२०१५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

४. सदर अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीडीआर-१०८७/ १७८१/ ५०-अकरा, दि. २४.११.१९८८ नुसार पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यापूर्वी मत्ता व दायित्वाबाबतचे विवरणपत्र विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, मुंबई यांना सादर करणे आवश्यक राहील.

५. सदर अधिकारी यांनी त्यांच्या सध्याच्या पदाचा कार्यभार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या आदेशानुसार अन्य कर्मचाऱ्याकडे सोपवून पदोन्नतीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे.

६. सदर अधिकारी हे ज्या दिवशी पदोन्नतीच्या पदावर रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांना पदोन्नतीविषयक लाभ अनुज्ञेय होतील.

७. विकास आयुक्त (उद्योग) यांनी सदर अधिकारी यांना पदोन्नतीच्या नवीन पदावर रुजू होण्याच्या दृष्टीने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, त्याबाबतचा कार्यपालन अहवाल शासनास सादर करावा.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१३०११७७८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vaijnath Bhujangrao Latake

Digitally signed by Vaijnath Bhujangrao Latake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8502d8fbaa5d3d31358e5bf349fc0853019893b61049b2ad260bccf75c596136, cn=Vaijnath Bhujangrao Latake
Date: 2016.01.22 13:01:55 +05'30'

(वै.भू.लटके)
शासनाचे उपसचिव.

प्रति, विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई

प्रत

१) मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव (उद्योग) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (*पत्राने)
५) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (१२/१६-ब), मंत्रालय, मुंबई.
६) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी
९) संबंधित अधिकारी
१०) निवडनस्ती (उद्योग-३)